# न्यू आर्ट्स,कॉमर्स ॲन्ड सायन्स कॉलेज, वर्धा

## मराठी विभाग

### बी.ए. — मराठी : प्रथम सत्र

### विषय — नाटक साहित्य प्रकार

## प्रश्न पेढी

## Question Bank

---

१. ‘नाटक’ हा कोणता कलाप्रकार आहे?

**अ) दृकश्राव्य** ब) दृक क) श्राव्य ड) यापैकी नाही

२. नाटक म्हणजे जीवनाची अनुकृती होय’ असे कोण म्हणतो?

**अ) ॲरिस्टाटल** ब) शेक्सपीअर क) प्र.के.अत्रे ड) यापैकी नाही

३. नाटकाचे माध्यम कोणते आहे?

**अ) संवाद** ब) ध्वनी क) आवाज ड) यापैकी नाही

४. नेपथ्य, वेशभूषा, प्रकाशयोजना, कलाकारांच्या हालचाली व हावभाव ही नाटकाची कोणती अंगे आहेत?

**अ) दृश्य** ब) श्राव्य क) दृकश्राव्य ड) सर्वच

५. संवाद, संगीत, ध्वनियोजना इ. नाटकाची कोणती अंगे आहेत?

**अ) श्राव्य** ब) दृश्य क) दृकश्राव्य ड) यापैकी नाही

६. भारतीय नाट्यशास्त्राचा जनक कोण?

**अ) भरतभूनी** ब) कपिलमुनी क) व्यासमुनी ड) वसिष्ठमुनी

७. भरताच्या नाट्यशास्त्राला कोणता वेद संबोधतात?

अ) ऋग्वेद ब) यजुर्वेद **क) पंचमवेद** ड) सामवेद

८. मराठी रंगभूमीचा उदय केव्हा झाला?

अ) सन १८०० ब) सन १८१८ **क) सन १८४३** ड) सन १८७४

९. ‘‘महाराष्ट्र नाट्यकलेचे विष्णुदास हे भरतमुनी आहेत’’ विधान कोणाचे?

अ) वि. का. राजवाडे ब) श्री. ना. बनहट्टी **क) शं. बा. मुजुमदार** ड) के. ना. काळे

१०. मराठी नाट्यसृष्टीतील रंगभूमीवरील पहिले नाटक कोणते?

**अ) सीतास्वयंवर** ब) लक्ष्मीकल्याणम् क) शाकुंतलम ड) सुभद्राहरणम्

११. मराठी रंगभूमीचा उदय प्रथम कोठे झाला?

**अ) सांगली** ब) तंजावर क) कोल्हापूर ड) धारवाड

१२. 'तागडथोम', 'अललडुर्र' असे नाटकांचे स्वरूप कोणाचे होते?

**अ) विष्णुदास भावे** ब) अण्णासाहेब किर्लोस्कर

क) कृ. प्र. खाडिलकर ड) श्रीपाद कृष्ण कोल्हटकर

१३. ''ज्ञानेश्वराने काव्यनाटकांचा मोठ्या आदराने उल्लेख केलेला आहे. कर्नाटकाची व्युत्पत्ती करताना रामदासाने नाटकाचा उल्लेख केला आहे. यावरून महाराष्ट्रात नाटके आज सहाशे वर्षे होत आली आहेत.'' हे उद्‌गार कोणाचे?

**अ) वि. का. राजवाडे** ब) शं.बा. मुजुमदार

क) श्री. ना. बनहट्टी ड) ग. रा. दंडवते

१४. 'मराठी रंगभूमीचा विश्वकर्मा' कोणास संबोधले जाते?

अ) अण्णासाहेब किर्लोस्कर ब) बाबाजीशास्त्री दातार

**क) विष्णुदास भावे** ड) श्रीपाद कृष्ण कोल्हटकर

१५. 'विष्णुदासांपासून खाडिलकरांपर्यत पौराणिक नाटके लिहिणाऱ्या सर्वांना मराठीतील जुनी किर्तनोपयोगी आख्याने आणि पुराणाख्याने मार्गदर्शक ठरली आहेत' हे विधान कोणाचे?

**अ) विनायक विठ्ठल पटवर्धन** ब) के. नारायण काळे

क) कृष्णशास्त्री राजवाडे ड) भास्कर दामोदर पाळंदे

१६. संस्कृतमधून मराठीत भाषांतरीत आणि पुस्तक रूपाने छापलेले पहिले नाटक कोणते?

**अ) सीतास्वयंवर** ब) लक्ष्मीनारायण क) प्रबोधचंद्रोदय ड) रूख्मिणीहरण

१७. इंग्रजीतील शेक्सपिअरच्या 'ऑथेल्लो' नाटकाचे मराठीत प्रथम भाषांतर कोणी केले?

**अ) महादेवशास्त्री कोल्हटकर** ब) नृसिंह चिंतामण केळकर

क) श्रीपाद कृष्ण कोल्हटकर ड) अच्युत बळवंत कोल्हटकर

१८. परशुराम तात्या गोडबोले यांचे संस्कृतमधून मराठीत भाषांतरीत नाटक कोणते?

अ) वेणीसंहार ब) उत्तमरामचरित्र क) नागानंद **ड) वरील सर्व**

१९. शेक्सपिअरच्या ‘द टेंपेस्ट’ नाटकांचे ‘वादळ’ नावाचे भाषांतर कोणी केले?

**अ) नीलकंठ जनार्दन कीर्तने** ब) काशिनाथ गोविंद नातू

क) महादेव गोविंदशास्त्री कोल्हटकर ड) बाजाबा रामचंद्र प्रधान

२०. ‘सिंबेलाइन’ चे ‘तारा’ हे भाषांतर कोणी केले?

**अ) न.ज.कीर्तने** ब)वि.मो.महाजनी क) आ.वि.पाटकर ड) का.गो.नातू

२१. मराठीतील पहिले सामाजिक नाटक कोणते?

**अ) मनोरमा** ब) स्वैरकेशा

क) मोर एल्एल बी ड) तरूणी शिक्षण नाटिका

२२. ‘सवाई माधवरावाचे नाटक’ रचना कोणी केलेली आहे?

अ) विनायक जनार्दन कीर्तने **ब) व्यंकटेश रंगो कटटी**

क) नारायण बापूजी कानिटकर ड) विरेश्वर सदाशिव छत्रे

२३. इसवी सन १८४३ ते १८७४ ही आधुनिक मराठी रंगभूमीची कोणती अवस्था होय?

**अ) शैशवावस्था** ब) किशोरावस्था

क) तारूण्यावस्था ड) प्रौढावस्था

२४. ‘आधुनिक मराठी रंगभूमी व नाटक यांच्या सृष्टीतील ‘युगपुरूष’ या पदवीचे खरेखुरे अधिकारी कोण?

अ) विष्णुदास भावे **ब) अण्णासाहेब किर्लोस्कर**

क) श्रीपाद कृष्ण कोल्हटकर ड) गोविंद बल्लाळ देवल

२५. मराठी बोलपटाचा प्रारंभ साधारणत: कोणत्या वर्षात झाला?

अ) सन १८८५ **ब) सन १९३०** क) सन १९२० ड) सन १८७४

२६. ‘इब्सेन’चे नाट्यतंत्र प्रथम कोणत्या नाटकाने मराठी प्रेक्षकांसमोर आणले?

**अ) आंधळ्यांची शाहा** ब) तक्षशिला क) तारा ड) किचक वध

२७. श्रीधर विनायक वर्त यांच्या नाट्यकृती कोणत्या वर्षातील आहेत?

अ) इ.स. १९२० ब) इ.स.१९३० क) इ.स. १९३१ **ड) इ.स. १९३३**

२८. ‘जगात एखादया मनुष्याचा नावलौकिक होऊ लागला म्हणजे माणसे त्याची बदनामी करतात’ या सूत्रान्वये रचलेले अत्रे यांचे नाटक कोणते?

**अ) पराया कावळा** ब) भ्रमाचा भोपळा क) कुलवधू ड) कन्यादान

२९. वृत्तपत्रसृष्टीचा त्याग करून नाट्यसृष्टीत पदार्पन करणारे नाटककार कोण?

अ) भा.वि.वरेरकर **ब) मो.ग.रांगणेकर** क) वि.वा.शिरवाडकर ड) प्र.के.अत्रे

३०. अनंत काणेकर यांनी 'डॉल्स हाऊस' चे केलेले रूपांतर कोणते?

**अ) घरकुल** ब) घराबाहेर क) कुलवधु ड) कन्यादान

३१. साने गुरूजी यांचे नाटक कोणते?

अ) अस्पृश्योवतार ब) सोन्या मारूती क) निळापक्षी **ड) वरील सर्व**

३२. मेटरलिंकच्या 'मोनाव्हॉना' वरून नाटककार शिरवाडकर यांनी रूपांतरीत केलेले नाटक कोणते.

अ) दूरचे दिवे **ब) वैजयंती** क) आनंद ड) राजमुकुट

३३. बर्नार्ड शॉ च्या 'पिग्मिलिय' नाकावरून पु.ल.देशपांडे यांनी बेतलेले नाटक कोणते?

**अ) ती फुलराणी** ब) सुदंर मी होणार क) भाग्यवान ड) अंमलदार

३४. 'सागरा प्राण तळमळला' ही नाट्यरचना कोणाची?

**अ) वि. दा. सावरकर** ब) बाळ कोल्हटकर

क) मधुसूदन कालेलकर ड) मधुकर तोरडमल

३५. 'कळसूत्री बाहुल्या, लळिते आणि तमाशा या नाट्यप्रकारांनी मराठी रंगभूमीची बहुमोल सेवा केली आहे', हे उद्गार कोणाचे?

अ) ग. रं. दंडवते **ब) वि. पां. दांडेकर** क) श्री. ना. बनहट्टी ड) के.ना. काळे

३६. नाटककार देवलांचे 'शारदा' नाटक प्रयोगरूपाने प्रथमरूपाने कोठे अवतरले?

अ) ग्वाल्हेर ब) बडोदे **क)इंदूर** ड) सांगली

३७. नाटककार गडकरी यांचे पहिले नाटक कोणते?

**अ) प्रेमसंन्यास** ब) पुण्यप्रभाव क) एकच प्याला ड) भावबंधन

३८. दारूच्या दुष्परिणामाचे करूणरम्य दर्शन घडविणारे गडकरी यांचे नाटक कोणते?

अ) पुण्यप्रभाव ब) प्रेमसंन्यास क) राजसंन्यास **ड) एकच प्याला**

३९. मेरी कॉरेलीच्या 'येल्मा' कादंबरीवरून 'कमला' नाटक कोणी लिहिले?

अ) नरसिंह चिंतामण केळकर ब) हरीभाऊ आपटे

**क) यशवंत नारायण चिटणीस** ड) विष्णू मोरश्वर महाजनी

४०. 'इब्सेन' हा कोणत्या देशातील नाटकार होता?

अ) इंग्लंड ब) इटली क) फ्रान्स **ड) नॉर्वे**

४१. श्री विष्णूदास भावे यांनी एकूण किती नाटके प्रसिद्ध केली?

अ) **५०** ब) ४९ क) ४८ ड) ४७

४२. सामाजिक नाटक लिहिणारे पहिले नाटकार कोण?

अ) **म.वा. पितळे** ब) बि.ज. किर्तने क) रा.ग.गडकरी ड) प्र.के.अत्रे

४३. गोविंद बल्लाळ देवळ हे कोणाचे शिष्य होते?

**अ) अण्णासाहेब किर्लोस्कर** ब) रा.ग. गडकरी क) वि.ज.किर्तने ड) यापैकी नाही

४४. समाज उद्‌बोधन, राष्ट्रवाद व स्वातंत्रकांक्षा निर्माण करणारी नाटके कोणी लिहिली?

**अ) कृ.प.खाडिलकर** ब) ग.रं.दंडवते क) के.ना. काळे ड) प्र.के.अत्रे

४५. इ.स. १९३३ मध्ये ‘नाट्यमन्वंतर’ नावाची संस्था स्थापना कोणी केली.

**अ) श्री.वि.वर्तक** ब) म.वा.पितळे क) के.ना.काळे ड) प्र.के.अत्रे